Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक

www.sahyandrinews.com

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal


• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ४९ • Title - Code :- MAHMAR49513 • गुरुवार दि.०९ नोव्हेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# ३५ लाख शेतकऱ्यांची दिवाळी गोड होणार-कृषीमंत्री धनंजय मुंडे

## १,७४३ कोटी रुपयांची पीक विम्याची रक्कम वितरणास प्रारंभ

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यांत हवामानातील असमतोलामुळे खरीप हंगाम वाया गेला आहे. शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळावी, यासाठी विरोधी पक्षाकडून सातत्याने सरकारवर टीका केली जात होती. आता दिवाळी सणाच्या तोंडावर राज्य सरकारकडून मोठी घोषणा करण्यात आली आहे. राज्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीक विम्याचे वाटप करण्यास सुरुवात झाल्याची महत्त्वाची माहिती राज्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे. ते मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलत होते.राज्यातील विविध जिल्ह्यांतील नुकसानग्रस्त क्षेत्राचं केलेल्या सर्वेक्षणाचे अंतरिम नुकसानीचे अहवाल प्राप्त झाले आहेत. त्यानुसार राज्यातील ३५ लाख शेतकऱ्यांना विम्याची रक्कम दिली जाणार आहे. ही रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केली जाणार आहे. आजपासून विम्याची रक्कम वितरीत करायला सुरुवात झाली आहे, अशी माहिती कृषीमंत्र्यांनी दिली.प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना कृषीमंत्री धनंजय मुंडे म्हणाले की, नुकसानग्रस्त क्षेत्रांचं केलेल्या सर्वेक्षणात




अंतरिम नुकसानीचे अहवाल प्राप्त झाले आहेत. त्या अहवालानुसार संबंधित जिल्हा प्रशासनाने निर्गमित केलेल्या अधिसूचनांना अनुसरून राज्यातील ३५ लाख ८ हजार शेतकऱ्यांच्या खात्यावर एकूण १ हजार ७४३ कोटी रुपये एवढी पीक विम्याची रक्कम वितरीत करण्यास आजपासून सुरुवात झाली आहे.

# मराठा-कुणबी, कुणबी-मराठा अभिलेखे तपासणीबाबत

## जिल्हास्तरीय विशेष कक्षाची स्थापना

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

विदर्भातील मराठा समाजास मराठा – कुणबी, कुणबी – मराठा जात प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेमध्ये अभिलेखे उपलब्ध करून घेऊन त्यांची छाननी करणे, कुणबी जातीच्या नोंदी असलेले अभिलेखे वेगळे करून त्याबाबतचा अहवाल सादर करणे, यासाठी निवासी उपजिल्हाधिकारी संजय पवार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय विशेष कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

मराठा समाजास मराठा – कुणबी, कुणबी – मराठा जात प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेमध्ये आवश्यक व अनिवार्य ब्रिटीश पुरावे, वंशवाळी, शैक्षणिक पुरावे, महसुली पुरावे, स्वातंत्रपूर्व झालेले करार, ब्रिटीश संस्थानिकांनी दिलेल्या सनदी, राष्ट्रीय दस्ताऐवज इत्यादी पुराव्यांची वैधानिक व प्रशासकीय तपासणी करण्याबाबत तसेच तपासणीअंती पात्र व्यक्तिंना कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र देण्याची कार्यपध्दती विहित करण्यासाठी शासनाने निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे. १५ सप्टेंबर २०२३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये सर्व जिल्ह्यातील विविध प्रकारच्या अभिलेख्यांची तपासणी करण्याचे निर्देश राज्य शासनाने दिले आहेत.त्यामुळे चंद्रपूर जिल्ह्यात यासंदर्भात विविध विभागांशी समन्वय साधणे, अभिलेखे उपलब्ध करून घेऊन त्याची छाननी करणे, कुणबी जातीच्या नोंदी असलेले अभिलेखे वेगळे करून त्याबाबत विहित नमुन्यातील अहवाल विभागीय आयुक्त, नागपूर व न्या. शिंदे समितीस कालमर्यादेत सादर करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या आदेशान्वये निवासी उपजिल्हाधिकारी संजय पवार यांच्या अध्यक्षतेखाली विशेष कक्ष स्थापन करण्यात आला आहे.निवासी उपजिल्हाधिकारी सदर कक्षाचे अध्यक्ष असून सदस्यांमध्ये जि.प. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), पोलिस उपअधिक्षक (गृह), सहाय्यक जिल्हा निबंधक (नोंदणी व मुद्रांक), सर्व तालुक्यातील भुमी अभिलेख उपअधिक्षक, शिक्षणाधिकारी (प्राथ.), शिक्षणाधिकारी (माध्य.), राज्य अबकारी कर विभागाचे अधिक्षक, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त, जिल्हा प्रशासन अधिकारी (नगर परिषद प्रशासन), कारागृह उपअधिक्षक, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी आणि जिल्हा वक्फ अधिकारी हे सदस्य आहेत

# एस एफ डी द्वारे नॅशनल युथ पार्लियामेंट करिता भाषण स्पर्धेचे आयोजन

## उत्कृष्ट ठरलेल्या १० विद्यार्थ्यांनाच मिळणार संधी

**वर्धा । प्रतिनिधी**

स्टुडंट्स फॉर डेव्हलपमेंट ( विकासार्थ विद्यार्थी ) च्या अंतर्गत महात्मा गांधी अंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय येथे नॅशनल एनवायरमेंट युथ पार्लियामेंट २०२४ करिता विश्वविद्यालय स्तरीय भाषण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. भाषण स्पर्धेत उत्कृष्ट ठरलेल्या १० विद्यार्थ्यांची निवड आगामी काळात आयोजित होणाऱ्या नॅशनल एनवायरमेंट पार्लियामेंट २०२४ करिता करण्यात आली आहे.

स्टुडंट्स फॉर डेव्हलपमेंट (विकासार्थ विद्यार्थी) च्या अंतर्गत पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकास या महत्वपूर्ण विषयांकडे युवकांचे लक्ष वेधण्याकरिता तसेच पर्यावरण संवर्धनाकरिता विचार मंथन करण्याच्या हेतूने आगामी काळात नॅशनल एनवायरमेंट युथ पार्लियामेंट २०२४ चे आयोजन होत आहे. यामध्ये देशभरातून विविध शैक्षणिक संस्थेतील निवडक विद्यार्थ्यांचा



समावेश राहणार असून विकासार्थ विद्यार्थी (स्टुडंट्स फॉर डेवलपमेंट) कडून विद्यापीठ आणि महाविद्यालय स्तरावरून निवड प्रक्रिया सुरु आहे. एस एफ डी अंतर्गत विविध शैक्षणिक संस्थांमध्ये भाषण स्पर्धेच्या मार्फत विद्यार्थ्यांची निवड केल्या जात आहे.हिंदी विश्वविद्यालयात सुद्धा युथ पार्लियामेंट या भाषण स्पर्धे मार्फत मार्फत १० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. यावेळी निर्णायक म्हणून डॉ. अभिषेक त्रिपाठी आणि अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे हिंदी विवि इकाई उपाध्यक्ष बापू चौहान उपस्थित होते. याप्रसंगी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद हिंदी विवि इकाई मंत्री अभिषेक द्विवेदी त्याचप्रमाणे एस एफ डी चे हिंदी विवि इकाई संयोजक मनन्य सिंह निर्वाण ,एस एफ डी चे हिंदी विवि इकाई सहसंयोजक संदीप गुप्ता उपस्थित होते.

# राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानच्या समान व असमान निधी योजनांसाठी शासनमान्य ग्रंथालयांकडून प्रस्ताव आमंत्रित

## ३० नोव्हेंबरपर्यंत प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

भारत सरकारच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता यांच्या समान निधी व असमान निधी योजनेअंतर्गत राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या सर्वांगीण विकासासाठी अर्थसहाय्याच्या विविध योजना ग्रंथालय संचालनालय, मुंबई यांच्यामार्फत राबविण्यात येतात.

सन २०२३-२४ या वर्षासाठी विविध समान व असमान निधी योजनांचा लाभ घेण्यासाठी राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांकडून विहित नमुन्यात प्रस्ताव मागविण्यात येत आहे. त्या संदर्भातील नियम, अटी व अर्जाचा नमुना प्रतिष्ठानच्या www.rrrlf.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. इच्छुक ग्रंथालयांनी अर्जाचा नमुना संकेतस्थळावरून डाऊनलोड करून घ्यावा.सन २०२३-२४ साठी समान निधी योजना: इमारत बांधकाम व विस्तार अर्थसहाय्याच्या योजना (रुपये २५ लाख)सन २०२२-२३ साठी असमान निधी योजना: ग्रंथालय सेवा देणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना ग्रंथ, साधनसामुग्री, फर्निचर, इमारत बांधकाम व विस्तारासाठी जसे फर्निचर खरेदी रु.४ लाख व इमारत बांधकाम रु. १० ते १५ लाखाचे अर्थसहाय्य., राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान ज्ञान कोपरा विकसित करण्यासाठी रु. २.५० लाखाचे अर्थसहाय्य व विशेष अर्थसहाय्य आधुनिकीकरणासाठी रु.२ लाखाचे अर्थसहाय्य, महोत्सवी वर्ष साजरे करण्यासाठी रु. ६.२० लाख व इमारत विस्तारासाठी रु.१० लाखाचे अर्थसहाय्य, राष्ट्रस्तरीय चर्चासत्र, कार्यशाळा, प्रशिक्षण वर्ग व जागरूकता कार्यक्रम आयोजनासाठी रु. १.५० लाख/रु.२.५० लाख व रु. ३ लाखाचे अर्थसहाय्य, बाल ग्रंथालय व राजा राममोहन रॉय ग्रंथालय बाल कोपरा स्थापन करण्याकरीता रुपये ६.८० लाखाचे अर्थसहाय्य देय राहील.योजनांचा लाभ घेण्यासाठी इच्छुकांनी प्रतिष्ठानचे ु.ीीश्रष.सीं.ळप या संकेतस्थळाला भेट द्यावी. आवश्यकता असल्यास संबंधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. ग्रंथालयांनी कोणत्याही एका योजनेसाठीचा प्रस्ताव विहित मुदतीत आवश्यक कागदपत्रांसह इंग्रजी/हिंदी भाषेत चार प्रतीत संबंधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयास दि. ३० नोव्हेंबरपर्यंत पोहोचतील अशा बेताने पाठवावेत. असे जिल्हा ग्रंथालय अधिकारी श्री. शेंडे यांनी कळविले आहे.

## २० नोव्हेंबर रोजी महिला लोकशाही दिन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जिल्हास्तरावर प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी महिला लोकशाही दिन तर चौथ्या सोमवारी तालुकास्तरीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. माहे, नोव्हेंबर महिन्याचा लोकशाही दिन सोमवार, दि. २० नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या दालनात आयोजित करण्यात येत आहे.

महिला लोकशाही दिनी न्यायप्रविष्ठ प्रकरणे, सेवाविषयक आस्थापने विषयक बाबी आणि विहित अर्जात नसलेली प्रकरणे स्विकारण्यात येणार नाहीत. तरी, ज्या महिलांचे वरील बाबी सोडून तक्रार, निवेदन वैयक्तिक स्वरुपाचे असतील अशा महिलांचे अर्ज महिला लोकशाही दिनाच्या १५ दिवसापूर्वी विहित नमुण्यात दोन प्रतीत जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयात सादर करावेत. जेणेकरुन, जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनास तक्रार अर्जाचा निपटारा करण्यासाठी संबधित विभागाला सदर तक्रार अर्ज पाठविण्यात येईल. विहित अर्जाचा नमूना मिळविण्यासाठी कार्यालयास भेट द्यावी, असे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांनी कळविले आहे.

# जिद्द,चिकाटी,परिश्रमातून यश प्राप्ती निश्चित-सुदर्शन निमकर



**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

तालुका स्तरीय '५१' व्या विज्ञान प्रदर्शनीचे वढोली येथे सरस्वती विद्यालयात दि.(७) मंगळवारी उद्घाटन पार पडले.भारतात विज्ञानाने केलेल्या प्रगतीमुळे जगभरात भारताची एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे.नुकतच चंद्रयान-३ देखील यशस्वी चाचणी पार पडली.ही खरी भारताची ओळख आहे विज्ञानाने केलेली प्रगती आहे.जिद्द,चिकाटी, परिश्रमातून यशप्राप्ती निश्चितच होते विद्यार्थ्यांनी प्रयत्न करत राहावे असे प्रतिपादन उद्घाटन प्रसंगी माजी आमदार तथा सर्वोदय शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष सुदर्शन निमकर यांनी मत व्यक्त केले.यावेळी जिल्हा परिषदच्या शिक्षणाधिकारी कल्पना चव्हाण,तालुका गट शिक्षण अधिकारी भसारकर,विमासे संघटना जिल्हा अध्यक्ष केशव ठाकरे,तालुका बाजार समिती संचालक सुहास माडूरवार,सरपंच राजेश कवठे,संचालक बाजार समीती संदीप पौरकर,उपसरपंच शिला खरबनकर,माजी पंचायत समिती सदस्य संजय वडस्कर, तमुस अध्यक्ष संदीप लाटकर, शिवसेना तालुका प्रमुख सुरज माडूरवार, मुख्याध्यापक चोखारे यांची व तालुक्यातील अनेक विद्यार्थी शिक्षकांची उपस्थिती होती. प्रदर्शनात तालुक्यातील ५४ शाळांनी भाग घेतला.यावेळी विद्यार्थ्यांनी समाजासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान,वर्षा सूचक यंत्र,जैविक शेती, प्रदूषण मुक्त शाळा,चंद्रयान अशा प्रतिकृतींचे प्रदर्शन केले.

# जिल्ह्यात १५८२ पथकामार्फत होणार कुष्ठरुग्ण व क्षयरुग्ण शोध अभियान

## २० नोव्हेंबर ते ६ डिसेंबर या कालावधीत मोहीम




**अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत सीईओकडून आढावा:**

राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत संयुक्त कुष्ठरोग व क्षयरुग्ण शोध अभियान जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. दि. २० नोव्हेंबर ते ६ डिसेंबर २०२३ या कालावधीत या मोहिमेची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. या संदर्भात जिल्हा परिषदेतील जनपद सभागृहात मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन यांनी जिल्हास्तरीय समन्वय समितीचा आढावा घेतला.बैठकीला जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) डॉ. संदीप गेडाम, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.ललितकुमार पटले, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अविनाश खंडारे, प्रभारी निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. हेमचंद कन्नाके, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक पराग जीवतोडे, जिल्हा लेखा व्यवस्थापक धर्मदास पाली आदी उपस्थित होते.


**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत संयुक्त कुष्ठरुग्ण व क्षयरुग्ण शोध अभियान जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. जिल्ह्यात सन २०२३-२४ या वर्षात दि. २० नोव्हेंबर ते ६ डिसेंबर २०२३ या कालावधीत या मोहिमेची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

सदर कालावधीत जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागामध्ये आशा स्वयंसेविका, पुरुष स्वयंसेवक व आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत कुटुंबातील प्रत्येक व्यक्तींची कुष्ठरोग व क्षयरोगाची आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. त्यानंतर,संशयीत कुष्ठरुग्णांची व क्षयरुग्णांची तपासणी करून प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत निदान करण्यात येणार आहे. जिल्ह्यात या मोहिमेकरीता कृती नियोजन करण्यात आले आहे.यामध्ये, जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील व महानगरपालिका कार्यक्षेत्रातील एकूण १८,३४,२४५ लोकांचा सर्व्हेद्वारे कुष्ठरोग व क्षयरोग रुग्णांचा शोध घेणार आहे. एकूण १५८२ पथकामार्फत हि शोध मोहिम राबविल्या जाणार आहे.समाजातील निदान न झालेले कुष्ठरुग्ण लवकरात लवकर शोधून त्यांना बहुविध औषधोपचाराखाली आणणे, नवीन सांसर्गिक कुष्ठरुग्ण शोधून औषधोपचाराद्वारे संसर्गाची साखळी खंडित करून होणारा प्रसार कमी करणे, क्षयरोगाच्या निदानाअभावी अद्यापही वंचित असणाऱ्या रुग्णांचा शोध घेऊन त्यांना औषधोपचारावर आणणे तसेच समाजात क्षय व कुष्ठरोगाविषयी जनजागृती करणे हा या मोहिमेचा उद्देश आहे.सदर कार्यक्रम हा जनतेच्या हिताचा असून यामध्ये आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत घरोघरी जाऊन आरोग्य शिक्षण व जनजागृती करण्यात येणार आहे. सर्व नागरिकांनी येणाऱ्या कर्मचाऱ्यामार्फत आपल्या आरोग्याची तपासणी करून घ्यावी. तसेच निदानित झालेल्या कुष्ठरुग्णांना मोफत औषधोपचार प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामीण रुग्णालय येथे मिळणार आहे. नागरिकांनी या अभियानास सहकार्य करावे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.

## संपादकीय

# रण आणि नीती



महाराष्ट्रात मराठा आरक्षणाच्या प्रश्नावरून उभे राहिलेले वादळ शमवण्यात एकनाथ शिंदे यांच्या तीन इंजिनाच्या सरकारला तूर्तास का होईना यश आले असतानाच, त्यांच्याच सरकारातील एक बलदंड मंत्री छगन भुजबळ यांच्या विधानामुळे आता नवे वादळ घोंगावणार काय, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. मराठा समाजाला सरसकट ‘कुणबी’ प्रमाणपत्र देण्याच्या आपल्याच सरकारच्या निर्णयाविरोधात त्यांनी निशाण फडकवले आहे.त्यांनी आक्रमक भाषेत आपल्याच सरकारला आव्हान दिले आहे. ‘मराठा समाजाला कुणबी म्हणून प्रमाणपत्र देणारे सत्तेतून जातील!’ अशी बंडखोरीची भाषा भुजबळ यांनी केली आहे. तीन दशकांपूर्वी शिवसेनेला अखेरचा ‘जय महाराष्ट्र’ करतानाही भुजबळ यांनी ओबीसी आरक्षणाचा झेंडाच खांद्यावर घेतला होता.मंडल आयोगास बाळासाहेब ठाकरे यांच्या असलेल्या विरोधाच्या मुद्यावरून तेव्हा शिवसेनेतून बाहेर पडून त्यांनी बंडाचा झेंडा फडकवला होता. आता पुनश्च एकवार ओबीसींचा नामगजर करताना, त्यांनी धोरणीपणाने पावले उचलली आहेत. शिवसेनेतून बाहेर पडल्यानंतर देशभरात त्यांनी आपली प्रतिमा ओबीसींचा मसिहा म्हणून जातीने खपून उभी केली आहे.आता राज्य सरकारने मनोज जरांगे-पाटील यांच्या उपोषणाच्या पेचातून बाहेर पडताना, त्यांना काही आश्वासने दिली असली तरी भुजबळ हे याच सरकारचा एक भाग असूनही आपली तीच प्रतिमा कायम राखू इच्छित आहेत, हे त्यांच्या आक्रमक पवित्र्यावरून लक्षात येते.गेली काही दशके आणि विशेषत: २०१४ मध्ये नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सत्ता आल्यानंतर भारतीय जनता पक्ष हा ओबीसींमध्ये आपले पाय घट्ट रोवत आहे. त्यामुळे आता भुजबळ यांची ही विधाने आणि जालन्यातच ओबीसींचा महामोर्चा आयोजित करण्याचा त्यांचा निर्णय हा तेच राजकारण पुढे नेण्याच्या प्रयत्नांचा भाग आहे, असे म्हणता येईल. याच जालन्यात शरद पवार यांनी मुख्यमंत्री असताना पहिल्यांदा ओबीसी आरक्षणाची घोषणा केली होती, याचे त्यांना स्मरण होणे साहजिकच आहे.खरे तर ओबीसी समाजाला मोठ्या प्रमाणात आपल्या प्रभावाखाली आणण्याची दीर्घकालीन रणनीती भाजपने आखल्याचे दिसते. महाराष्ट्रात राजकीयदृष्ट्या प्रभावी असलेल्या दोन मोठ्या समाजघटकांना आपल्याकडे कसे वळविता येईल, हा त्या पक्षाचा प्रयत्न राहिलेला आहे.एकीकडे मराठा समाजातल्या ठिकठिकाणच्या प्रमुख नेत्यांना थेट पक्षात प्रवेश देण्याचा मार्ग अवलंबला जात आहे, तर ओबीसींमधील विविध जाती भाजपच्या छत्राखाली कशा एकवटतील व त्याचा राजकीय फायदा कसा मिळविता येईल, हेही पाहिले जात आहे.भुजबळांच्या आक्रमक पवित्र्याची ही राजकीय पार्श्वभूमी लक्षात घेतली तर वेगवेगळ्या बिंदूंना जोडणारी रेषा कोणती आहे, हे दिसू लागते. एकाचवेळी विरोधी आणि सत्ताधारी असे दोन्ही अवकाश व्यापण्याच्या प्रयत्नांचे हे नमुनेदार उदाहरण आहे. एकीकडे सरकारविरोधात बोलतानाही त्याचा फायदा मात्र भाजपलाच व्हावा, अशी ही भुजबळ यांची चतुर खेळी आहे.जरांगे-पाटील यांच्या उपोषणानंतर राज्याच्या काही भागांत तणावाचे वातावरण होते. ती आग तूर्त शमली असे चित्र स्पष्ट झाल्यानंतर भुजबळ यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. मराठा समाजाच्या आरक्षणाला विरोध नाही; परंतु ओबीसींच्या आरक्षणात वाटेकरी नकोत, हे त्यांनी याआधीही सांगितले होते. पण आत्ताच्या तणावाच्या आणि प्रक्षुब्ध झालेल्या वातावरणात त्यांच्या या जाहीर भूमिकेमुळे ध्रुवीकरण धारदार होण्याची चिन्हे आहेत.काँग्रेसमधील ओबीसी नेते व विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनीही भुजबळ यांचीच री ओढणे, हे अर्थपूर्ण आहे. मात्र, ती काँग्रेस पक्षाची अधिकृत भूमिका आहे काय, हेही बघावे लागणार आहे.त्याहीपेक्षा महत्त्वाची बाब म्हणजे ज्या अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली भुजबळ यांनी शरद पवार यांची साथ सोडून भाजपशी घरोबा करून सत्ता पटकावली, त्यांची या प्रश्नावरील नेमकी भूमिका काय आहे, असाही प्रश्न आता उपस्थित होईल.पण या राजकीय डावपेचांपलीकडेही विचार करावा लागेल. राज्यातील सामाजिक ऐक्याची वीण उसवू नये, यासाठी प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे. ‘‘मराठा व ओबीसी यांचे संबंध जिवाभावाचे आहेत’’, हे मनोज जरांगे-पाटील यांचे ताजे विधान यासंदर्भात काहीसा दिलासा देणारे आहे. मुद्दा असा आहे की मराठा समाजाचे जे मूलभूत प्रश्न आहेत, त्यांच्याकडे लक्ष देण्याचा.एकीकडे शेतीक्षेत्राची दुरवस्था आणि अन्यत्र संधींचा अभाव या कोंडीत सापडलेल्या या समाजासाठी सरकारला सक्रिय व्हावेच लागेल. त्यादृष्टीने आरक्षणाच्या मागणीची तड कशी लावता येईल, हे पाहायला हवे. ही सार्वत्रिक भावनाही आहे. अर्थात केवळ भावनिक हाकारे घालून आर्थिक प्रश्न सुटत नाहीत, हेही लक्षात घ्यायला हवे.त्यामुळे खरे तर राज्यातील रोजगार संधींचा परिघ कसा विस्तारता येईल, यासाठी आर्थिक-औद्योगिक आघाडीवर व्यापक प्रयत्न करण्याची गरज आहे. राजकीय चर्चाविश्वात या गोष्टींना मध्यवर्ती स्थान मिळायला हवे. समृद्धीतच आर्थिक-सामाजिक न्यायाला वाव मिळतो, हे वास्तव नजरेआड करता येणार नाही. रोजगारनिर्मितीचे ठोस उद्दिष्ट समोर ठेवून काम करायला हवे.लोकांमधल्या सुप्त क्षमतांना जो वाव देतो आणि त्यांना प्रगतिपथावर नेतो, तो चांगला नेता.


# मोबाईलने बालपणातील खेळांवर लावला अंकुश ही अत्यंत गंभीर बाब

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**



आपण म्हणतो बालपण देगा देवा!परंतु आज आपले बालपण मोबाईल हिरावून घेत आहे ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. स्मार्टफोन दिवसेंदिवस छोट्या-छोट्या बालकांसाठी व युवावर्गासाठी घातक सिद्ध होत.त्याचप्रमाणे शाळांमध्ये सुध्दा विद्यार्थीवर्ग मोबाईलचा मोठ्या प्रमाणात वापर करीत आहे व यांचे दुष्परिणाम हळूहळू सामोरं येतांना दिसत आहे.एक वर्षांवरील मुलं रडतात म्हणून आई-वडील मुलांच्या हातात मोबाईल देवुन आपली सुटका करून घेतात.याचेही दुष्परिणाम हळूहळू समोर येतांना दिसत आहे.ही परिस्थिती फक्त भारतातच नाही तर संपूर्ण जगात आपल्याला पहायला मिळते.यामुळे जगातील संपूर्ण शाळांनी मोबाईलवर बंदी आणावी असा सुचक सल्ला युनेस्कोने दिला आहे.देशासह जगात डिजिटल क्रांती झाली अवश्य परंतु त्याचा गैरवापर विद्यार्थ्यांच्या व युवकांच्या अंगाशी येतांना दिसत आहे.सोबतच बालवयात आई-वडील मुलांना मोबाइलच्या आहारी टाकतांना दिसतात.स्मार्टफोनमुळे सामाजिक, व्यवहारीक व इतर क्षेत्रात आमूलाग्र बदल झाल्याचे आपल्याला दिसुन येते.आज मोबाईलच्या अतिवापरामुळे कोणीही कोणासोबत समक्ष बोलायला तयार नाही,घरात सर्वसाधारण चर्चा करायला तयार नाही, कोणत्याही गोष्टीची बोलण्यातून देवाणघेवाण किंवा आदानप्रदान होत नाही कारण एक वर्षांच्या मुलांपासून ते मोठ्या पर्यंत सर्वच घंटोनघंटे मोबाईलमध्ये व्यस्त असतात. पालक आपल्या जबाबदारीपासुन पळ काढण्यासाठी व अतिलाडामुळे चिमुकले सुध्दा मोबाईलच्या आहारी गेले आहेत.यामुळे मानसिक आजार वाढण्याची दाट शक्यता आहे आणि वाढत आहे. मोबाईलच्या गेममध्ये युवावर्ग दिवसेंदिवस फसतांना दिसत आहे.याचे मुख्य कारण म्हणजे भारतात युवावर्ग मोठ्या प्रमाणात मोबाईलच्या आदिन झालेले आहेत. यामुळे त्यांना अनेक व्याधींचा सामना करावा लागतो आहे.शिक्षण क्षेत्रातील डिजिटल क्रांती विद्यार्थांसाठी चिंताजनक असल्याचे मत युनेस्कोच्या अहवालातून समोर आले आहे.मोबाईलचा अतिरिक्त वापर झाल्याने शैक्षणिक कामगिरी मंदावते.स्क्रीन टाईम वाढल्याने मुलांच्या भावनिक स्थिरतेवर नकारात्मक परिणाम होतो.परिणामी,मुले चिडचिडे व रागीट बनतात असेही युनेस्कोने म्हटले आहे.यामुळे मुलांमधील फिजिकल एक्टिविटी दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात कमी होतांना दिसत आहे हा अत्यंत चिंतेचा आणि गंभीर विषय आहे.देशात ७४ टक्के मुले (११ ते १७ वयोगटातील) रोज ३० मिनीटेही मैदानी खेळ खेळत नाही.त्याचप्रमाणे १६ ते ३४ वयोगटातील ५९ टक्के लोक ऑनलाईन खेळ ३-३ तास खेळण्यात मग्न असतात.म्हणजेच आजची युवा पिढी मोबाईलच्या खेळांमध्ये (गेममध्ये) मोठ्या प्रमाणात मग्न असल्याचे स्पष्ट दिसून येते.यामुळे शरीराला आवश्यकतेनुसार पाहिजे तेवढा व्यायाम मिळत नाही.डब्लुएचओच्या रिपोर्ट नुसार भारतात ११ ते १७ वयोगटातील ७४ टक्के मुले फिजीकल एक्टिव्ह नसल्याचे सांगितले जात आहे.म्हणजेच एका आठवड्यात मुलं १५० मिनिटसुध्दा खेळत नाही किंवा शारीरिक हालचाली ज्या पध्दतीने पाहिजेत त्या पध्दतीने दिसून येत नाही.यावरून स्पष्ट होते की आजचा विद्यार्थीवर्ग व युवावर्ग दिवसेंदिवस डोक्यानी कितीही हुशार असेल परंतु शारीरिक दृष्ट्या खालावत असल्याचे दिसून येते. देशातील ४१ टक्के लोक मोबाईलच्या नादामुळे शारीरिक व्यायामाच्या दृष्टीकोनातून एक्टिव नसल्याचे दिसून येते.म्हणजे आज बालपणापासुन तर युवा वर्गापर्यंत आणि युवावर्गापासुन तर वयस्कर लोकांना सुद्धा मोबाईलने चांगलेच जखडल्याचे आपण पहातो.यामुळे शरिराला ज्या पध्दतीने आणि ज्याप्रमाणात व्यायामाची आवश्यकता आणि गरज आहे तो मिळत नसल्याने अनेक व्याधी किंवा आजार बालकांमध्ये, युवावर्गामध्ये व अन्य लोकांमध्ये दिसून येते व यांचा परिणाम आरोग्यावर मोठ्या प्रमाणात विपरीत परिणाम होत आहे.आज भारतातच नाही तर संपूर्ण जगात मोबाईल शिवाय जिवन अधुरे असल्याचे सर्वांना वाटते. परंतु मोबाईलचा वापर दिवसेंदिवस मानवाच्या दृष्टीकोनातून घातक सिद्ध होत आहे हेही तितकेच सत्य आहे याला कोणीही नाकारू शकत नाही.म्हणजेच मोबाईलचा अती वापर जीव घेणा सीध्द होवू शकते यालाही नाकारता येत नाही.मानवाच्या मेंदूला (मस्तिष्कला) रक्तपुरवठा व्यवस्थित आणि सुरळीत झाला नाही तर (स्ट्रोक)होण्याचे मोठे कारण ठरू शकते.स्ट्रोक म्हणजे पॅरालिसीसचा टॅक अथवा लकवा किंवा ब्रेन टॅक असेही म्हणतात.देशात स्ट्रोकच्या आजाराचे जवळपास ६५ लाख रूग्ण असल्याचे सांगितले जाते.म्हणजेच आजच्या घडीला मोबाईलच्या अती वापरामुळे मानवजाती अत्यंत धोकादायक स्थितीत आल्याचे समजते.ही बाब स्पष्ट होते की मोबाईलच्या अती वापरामुळे लठ्ठपणा, शुगर (मधुमेह), डोळ्यांचा आजार ,मानेचा त्रास,हार्टच्या आजारासह अनेक आजार मानवाच्या शरिरात घर करीत आहे.याचे मुख्य कारण म्हणजे शरीरातील अवयवांना पाहिजे त्याप्रमाणात व्यायाम मिळतच नाही.त्यामुळे ही कठीण परिस्थिती उध्दभवत आहे.मानवाला मोबाईलमुळे जेवढा आनंद मिळतो त्यापेक्षा जास्त धोका मोबाईलमुळे होणाऱ्या आजारामुळे निर्माण होत आहे.त्यामुळे मोबाईलचा वापर कमीत कमी कसा करता येईल व आपल्याला शारीरिक दृष्ट्या कोणताही धोका निर्माण होणार नाही यापध्दतीने मोबाईलचा वापर व्हायला हवा.अमेरिकन केडमी ऑफ पीडियाट्रिक्स या संस्थेने एका संशोधनात म्हटले आहे की दोन ते चार वर्षांच्या मुलांनी दिवसातून फार तर एक तास फोन वापरणे योग्य असल्याचे संशोधनात म्हटले आहे.चार वर्षांपेक्षा जास्त वयाच्या मुलांनी दररोज दोन तास मोबाईल वापरणे योग्य आहे.यापेक्षा जास्त मोबाईल वापरल्यास डोळ्यासोबतच मानसिक आरोग्यावरही विपरीत परिणाम होतो यानंतर यांचे भयंकर परिणाम भोगावे लागू शकतात.आपण काय करायचं आणि काय करू नये हे आपणच ठरवू शकतो व धोकादायक वस्तू पासून दुर राहु शकतो.आज आपण पहातो ३ ते २० वर्षे वयोगटातील मुले-मुली टीव्ही पहाताना, जेवतांना मोबाईलला चीपकुन रहातात. जनुकाय मोबाईल बीना जिवन अधुरे आहे की काय अशी परिस्थिती दिसून येते.याचा दुष्परिणाम पुढेचालुन भयानक होवू शकतो.छोटे मुलं रडायला लागले की आई-वडिल त्यांच्या हातात मोबाईल देऊन मोकळे होतात परंतु हे घातक आहे.त्यामुळे पालकांना आग्रहाची विनंती करतो की मुलांना मोबाइल पासून जितके दुर ठेवता येईल तितके दुर ठेवलेच पाहिजे. यामुळे मुलांना फिजिकल एक्टीव्हीटी किंवा व्यायाम करण्यास मदत होईल.मोबाईलचा अती वापर शरिराला घातक आहेच त्याचबरोबर त्याचा गैरवापर केला तर जीवाला सुध्दा धोका निर्माण होऊ शकतो आणि होत आहे.आजही लोक वाहन चालवितांणा मोबाईलवर बोलत रहातात यामुळे अनेक दुर्घटना झाल्याचे आपण पहातो आणि यामुळे देशात मोठ्या प्रमाणात जीवीत हाणी सुध्दा झाल्या आहेत. मोबाइल वापरायला हरकत नाही.परंतु त्याचा योग्यवेळी आणि कमीत कमी वापर व्हायला पाहिजे.अन्याथा मोबाईलमुळे जेवढे सुख आणि आनंद मिळतो.त्यापेक्षा हजार पटीने आपल्याला यातना किंवा दु:ख भोगाव्या लागतील हेही तितकेच सत्य आहे. त्यामुळे मुलांनी मोबाईल हातात घेण्यापेक्षा पुस्तक, वर्तमानपत्र हातात घेतले तर बुध्दीचा विकास झपाट्याने होईल व पुस्तकी ज्ञानामुळे शरिराच्या विकासाला मोठी चालना मिळेल. आपण एकंदरीत विचार केला तर मोबाईल युगामुळे देशातील मातीतील छोटे-छोटे खेळ नामशेष झाले किंवा होण्याच्या मार्गावर आहेत.त्यामुळे अनेक आजारांचा सामना करावा लागतो आहे.आजच्या युवापिढीला जुने खेळ काय होते ते सुद्धा माहिती नाही आणि या संपूर्ण गोष्टी मोबाईलमुळे उध्दभवतांना दिसते. म्हणजेच आजचे मोबाईल युग बालकांसाठी,युवा वर्गासाठी किंवा विद्यार्थांना शारिरीक दृष्ट्या अपंग करीत असल्याचे दिसून येते.यावरून असे लक्षात येते की वर्चुअल खेळांमुळे रियल खेळ हळूहळू नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.आज मोबाईलची दुनिया पहाता असे वाटते कहा गये ओ दिन

# एक दिवा दिवाळीचा,तर एक दिवा वृक्ष लागवडीचा असावा





पर्यावरणाची ढासळती परीस्थिती पहाता फटाक्यांपेक्षा पनत्याच्याप्रकाशन दीवाळी साजरी करावी. मानवाच्या अतीरेकामुळे निसर्गाचे संतुलन दीवसें दीवस ढासळतांना दीसत आहे.यामुळे पर्यावरणावर विपरीत परिणाम होवून मानवाच्या जिवाला मोठा धोका निर्माण झाला आहे.वाढते वायुप्रदूषण पहाता अनेक राज्यांत प्रदूषीत फटाक्यांवर बॅन लावलेला आहे. यावर महाराष्ट्र सरकारने सुध्दा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. दिल्लीच्या आसपासच्या राज्यात पराली जाळत असल्यामुळे दिल्लीमध्ये गॅसचेंबर सारखी परीस्थिती नेहमीच निर्माण होत असते.त्यामुळे दिल्लीमध्ये यावर्षी फटाक्यांवर बंदी असल्याचे सांगण्यात येते.दीवाळीला देशात करोडो रुपयांचे फटाके फुटतील परंतु यामुळे वाढत्या प्रदुषणात मोठ्या प्रमाणात भर पडु शकते.फटाक्याबद्दल हायकोर्टाचे व सुप्रिम कोर्टाचे अनेक आदेश आलेत.परंतु ते फक्त कागदावरच दिसतात. प्रदुषनाच्या बाबतीत फक्त कायद्याला धरून चालता येणार नाही तर नागरिकांनी प्रदुषनाच्या बाबतीत जनजागृती करून आवाज उठविला पाहिजे.भारतात प्रदुषनाच्या बाबतीत अनेक वर्षांपासून जनजागृती सुरू आहे ही अत्यंत आनंदाची बाब आहे.त्यामुळे सरकारी माहीतीनुसार यावर्षी फटका विक्री कमी होणार असल्याचे सांगण्यात येते.तरीही वायुप्रदूषण मानव,पशु-पक्षी व जिवजंतु यांच्यासाठी अत्यंत घातक आहे.आज वायुप्रदूषणामुळे अनेक पशुपक्षी, औषधीयुक्त वनस्पती लुप्त झाल्याचे दिसून येते.त्याचप्रमाणे जगात वाढत्या प्रदूषणामुळे ३० टक्के वृक्षप्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत आणि विविध देशांतील १४२ प्रजाती याआधीच पृथ्वीतलावरून लुप्त झाल्या आहेत.यावरून स्पष्ट होते की प्रदुषणाने भयावह रूप धारण केले आहे. सोशल मीडियाने आपल्या नेटवर्क करीता देशात लाखोच्या संख्येने टावर उभे केल्याचे दीसुन येतात. याच्या रेडिएशनमुळे विपरीत परिणाम मानव, पशुपक्षी व जिवजंतुवर होतांना दीसतो.म्हणेज जेवढ्या सुखसुविधा तेवढेच आयुष्यसुध्दा कमी होत आहे हीबाब यावरून सिद्ध होते.त्यामुळे प्रदुषन टाळण्यासाठी जे कोणते उपाय आहे ते नागरिकांनी अंगीकारले पाहिजे.आज निसर्ग व पर्यावरणाला काळीमा फासण्याचे काम मुख्यत्वेकरून वायुप्रदूषणाने केले आहे व यात भर टाकली जलप्रदूषणनाने कारण देशातील अनेक कारखान्यांचे पाणी थेट नद्यांना जावुन मिळत आहे यामुळे दुषित पाण्याचे प्रमाण सुध्दा मोठ्या प्रमाणात वाढले आहे. यामुळे आज मानव व पशुपक्षांचे जगने अत्यंत कठीण झाले आहे.त्याचप्रमाणे जंगल तोडीमुळे जंगल संपदा दिवसेंदिवस नष्ट होण्याच्या मार्गावर आहे त्यामुळेच आज अनेक गावांत व शहरांमध्ये हिंसक पशु प्रवेश करतांना दीसतात.म्हणजेच मानवाने पशुपक्ष्यांच्या व निसर्गाच्या घरावर आक्रमक केल्याचे स्पष्ट दिसुन येते.सध्याच्या परीस्थितीत पाकिस्तान पिसाळलेल्या कुत्र्यासारखा करीत आहे. कारण पाकिस्तान दरवर्षी हिवाळ्यात म्हणजेच ऐन दिवाळीच्या फटाक्यांचा गैर फायदा पाकिस्तानी आतंकवादी घ्यायचे.परंतु सध्याच्या परिस्थितीत भारताने संपूर्ण जगात पाकिस्तानची नाकेबंदी केलेली आहे. त्यामुळे पाकिस्तान तिलमिला झालेला आहे व त्याची हरप्रकारे कोषीश आहे की एलओसीच्या मार्गे भारतात आतंकवादी पाठवून शांतता भंग करायची आणि तो सध्याच्या परिस्थितीत कायरतापुर्ण व घृणास्पद कृत्य जम्मू काश्मीरमध्ये करीत आहे.परंतु भारतीय जवानांनी आतंकवाद्यांची संपूर्ण नाकेबंदी करून यमलोक पाठवीण्याचे काम सुध्दा युद्धपातळीवर सुरू आहे.दीवाळी हा भारतीयांचा महत्त्वपुर्ण सन आहे.या सणाच्या निमित्ताने भारतात अनेक ठिकाणी फटाक्यांची आतिषबाजी आपल्याला पहायला मिळेल.परंतु यात जहरघोळण्याचे काम आतंकवादी करू शकतात याला नाकारता येत नाही.आतंकवाद्यांना जशास तसे उत्तर देण्यास भारतीय सेना सज्ज आहे यात शंका नाही परंतु नागरिकांनी फटाके फोडताना सतर्कता बाळगली पाहिजे. कारण आतंकवादी दीवाळीच्या फटाक्यांचा फायदा घेवुन घृणास्पद कारवाई करू शकतात. त्यामुळे नागरिकांनी सावध रहाण्याची गरज आहे. दीवाळी सण म्हटला की फटाके आलेच कारण फटाक्यांशिवाय दीवाळी अधुरीशी वाटते.त्यामुळे दीवाळीला घरोघरी फटाके फोडले जातात.परंतु फटाके फोडताना कमी आवाजाचे व कमी फटाके फोडले पाहिजे. जेणेकरून ध्वनी प्रदुषण व वायुप्रदूषण होणार नाही याची दक्षता जनतेनेच घ्यावयास पाहिजे.त्याचप्रमाणे सुप्रिम कोर्टाने व सरकारने घालून दिलेल्या संपूर्ण नियमांचे काटेकोरपणे पालन केले पाहिजे. दिनांक १९ आक्टोंबर २०१८ ला ध्वनी प्रदूषणामुळे अमृतसर येथील महाभयानक घटना घडली.ही घटना भारतासह संपूर्ण जगाला काळीमा फासणारी व अंधारात नेणारा अपघात ठरला.कारण रावण दहणाच्या फटाक्यांचा आवाज व रेल्वे येण्याची वेळ एकत्र झाली.त्यामुळे नागरिकांना रेल्वेचा आवाजच लक्षात आला नाही.त्यामुळे रेल्वेट्रॅकवर बसुन रावण दहनाचा आनंद घेणारे ७० हुन अधिक लोकांना आपले प्राण गमवावे लागले आणि हा प्रकार फटाक्यांच्या ध्वनीप्रदुषणाने व आवाजाने झाला.त्यामुळे नागरिकांना माझी नम्रविनंती आहे की या सर्व घटना लक्षात घेऊन फटाके फोडावेत. मुख्यत्वेकरून लहान मुलांना फटाक्यांपासुन दुर ठेवलेले बरे कारण फटाक्यांच्या दुर्घटना लहान मुलांच्या बाबतीत जास्त होतांना दिसतात. देशात फटाक्यांमुळे दरवर्षी १५ हजारहून अधिक लोक आपली दृष्टी गमावतात.त्यामुळे फटाका दीसायला जीतका चांगला तीतकाच तो घातक आणि उग्र व धोकादायक सुध्दा आहे ही बाब नागरिकांनी लक्षात ठेवली पाहिजे.त्याचप्रमाणे लहान असो किंवा मोठा व्यक्ती असो त्यांनी हातात फटाके फोडु नये त्यामुळे दुर्घटना ओढावु शकते.माझ्यामते फटाके फोडने चुकीचे नाही.परंतु ध्वनी प्रदुषण, वायुप्रदुषण व दुर्घटना होणार नाही याची काळजी जनतेने घ्यावयास पाहिजे.आपण जर दरवर्षी ५०० रूपयांचे फटाके घेत असाल तर यावेळी ते ३०० रूपयांचे घ्यावे यामुळे पैसा वाचेल व ध्वनी प्रदूषण आणि वातावरणातील प्रदुषण यावर मागच्या तुलनेत जास्त नियंत्रण ठेवता येईल.संपुर्ण भारतात दीवाळीच्या सणाला अरबो रूपयांचेफटाके फुटणार यात शंका नाही.परंतु हे अरबो रूपये धुळासारखे उडुन जातील पण त्या धुळातील प्रदुषन मात्र मानवाच्या काळजात व शरिरातघर करून राहील ही बाब मानव, पशुपक्षी व जिवजंतु यांना घातक ठरू शकते याला नाकारता येत नाही.आजच्या परीस्थितीत बारूद ही संपूर्ण जगाची अत्यावश्यक वस्तु बनली आहे.त्यामुळे आज संपूर्ण जग बारूदच्याढीगाऱ्यावर बसलेले दीसुन येते.यामुळे जगात आपल्याला युद्धजन्य परीस्थिती पहायला मिळते.याचे जिवंत उदाहरण म्हणजे अफगाणिस्तानवर तालिबान्यांचा कब्जा, अझरबैजान-आर्मेनिया युद्ध,गेल्या १९ महिन्यांपासून सुरू असलेले युक्रेन-रशिया युद्ध अत्यंत भयावह स्थितीत येवून ठेपले आहे,चीन -तैवान संघर्ष सुरूच आहे आणि आता ७ ऑक्टोबर २०२३ पासून सुरू असलेले इजरायल विरूद्ध हमास आतंकवाद्यांचा संघर्ष टोकाला पोहोचला आहे व यात हजारोंच्या संख्येने लोकांचा मृत्यू होत आहे.त्याचप्रमाणे अनेक देशांत मोठ्या प्रमाणात गृह युद्ध सुध्दा दिसून येते.म्हणजेच आज सर्वत्र बारूदचा शिडकाव दिसून येते.कोणतीही बारूद असो ती विनाशाकडे नेतांना दीसत आहे.त्यामुळे फटाके सुध्दा बारूदच आहे करीता कमीत-कमी फटाके कसे फोडता येईल याकडे नागरिकांनी लक्ष दीले पाहिजे.आपण दीवळीला अनेक पक्वांन बनवीतो, फटाके फोडतो, छोटे-छोटे किल्ले बनवितो.परंतु यात आणखी एक भर टाकुन या दीवसाला प्रत्येकाने आपल्या घरासमोर एकतरी झाड लावावे जागा नसेल तर एखाद्या कुंडीत झाड लावुन दीवाळी साजरी करावी.कारण आज बदलत्या काळानुसार वृक्षलागवड होने अत्यंत गरजेचे आहे मग ती कोणत्याही रूपात झाली तरी चालेल.यामुळे प्रदुषन रोखण्यास आपणा सर्वांना यश येईल व करोडो झाडे लावल्या जातील.याचा फायदा पर्यावरणाला मोठ्या प्रमाणात होईलच.यामुळेगुरांना चारा व मानवाला वारा आणि सर्वांना सावली मिळेल. फटाके एकाक्षणात संपतील परंतु झाड जर लावले तर ती एक आठवण अनेक काळपर्यंत राहील व आपणा सर्वांना दीर्घायुष्य लाभेल.अशाप्रकारे हरीत दिवाळी निर्माण होईल.असे जर संपूर्ण भारतात झाले तर पर्यावरणाच्या बाबतीतदिवाळी हा ऐतिहासिक सणसमजल्या जाईल.दिवाळीच्या फटाक्यांचा फायदा आतंकवादी घेणार नाही याचीही काळजी जनतेने घ्यावी.पनत्यांचा एवढा प्रकाश पडुद्या की, सर्वांच्या जीवनात प्रकाशमय जोत जळत राहीली पाहिजे. ज्याप्रमाणे जगातील बलाढ्य देशाचे दुष्मण आतंकवादी आहेत त्याचप्रमाणे भारताचे कट्टर दुष्मन आतंकवादी आहेत.त्यामुळे ते दीवाळीच्या सनाला घात-पात करु शकतात.त्यामुळे सर्वांनी सावधगिरी बाळगावी व दीवाळीचा सन आनंदात साजरा करावा.कारण अमेरिका, रशिया, चिन, फ्रान्स,ब्रिटन,जापान,जर्मन, भारत , इस्त्रायल इत्यादी अनेक बलाढ्य राष्ट्र आतंकवादी कारवाईने त्रस्त आहेत.परंतु भारताने पाकिस्तानवर सर्जिकल स्ट्राईक केल्याने व जम्मु काश्मिर मधील कलम ३७० व ३५ ए हटविल्याने आतंकवाद्यांची कंबरडे मोडल्या गेले व जम्मु काश्मिरमधील आतंकवाद हळूहळू संपुष्टात येत आहे.परंतु पाकिस्तान असा देश आहे की कुत्र्याचे शेपूट वाकडे ते वाकडेच कारण पाकिस्तान रक्तबंबाळ झालेला देश आहे त्यामुळे त्यांच्या आतंकवादी कारवाया सुरूच आहे. यावर भारतीय जवानांची करडी नजर आहेच. परंतु भारतीय जनतेनेही प्रत्येक सनाला सावधगिरी बाळगावी ही १३९ कोटी जनतेची जबाबदारी आहे.आप-आपल्यापरीने नियमांचे पालन करून प्रदुषणावर सर्वातोपरी मात करावी व काळाच्या गरजेनुसार हरित दिवाळी साजरी करावी.असे जर झाले तर यावर्षीचा दिवाळी सण सुवर्ण अक्षरात लिहिल्या जाईल. पर्यावरण सुरक्षीत तर मानव, पशु-पक्षी सुरक्षीत आणि मानव सुरक्षीत तर देश सुरक्षित देश सुरक्षित तर जग सुरक्षित.हा मुलमंत्र सर्वांनीच अंगीकारला पाहिजे.कारण दिवसेंदिवस जगभरातील हवामानातील वाढता बदल अत्यंत धोकादायक स्थितीत येवून ठेपला आहे.यामुळे याचा फटका जगाला भोगावा लागत आहे.हवामानातील आमुलाग्र बदल पहाता विविध स्वरूपातील विक्राळ रूप आपल्याला पहायला मिळत आहे यात चक्रीवादळ, अतीवृष्टी,पुरपरिस्थिती, सुनामी,भुकंप, ज्वालामुखीचा उद्रेक,भुस्खनन,अती उष्णता,दुष्काळ सोबतच दिवसेंदिवस वाढती समुद्राची पातळी यामुळे जगाला मोठा धोका निर्माण झाला आहे व मोठे नुकसान होत आहे.यावरून स्पष्ट होते की निसर्गाला टीकवुन ठेवने काळाची गरज आहे. त्यामुळे दिवाळीचा सण लक्षात घेता प्रत्येकांनी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्याचा संकल्पकेला पाहिजे. दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!

# दुष्काळासारखा विषय तरी राजकारणातून वगळा–उद्धव ठाकरे

**मुंबई**–नव्याने काही तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्याचे 'लॉलीपॉप' राज्य सरकारने दाखविले आहे. मात्र ते तालुके आणि विभाग कोणते याचा तपशील अद्यापि गुलदस्त्यात आहे. मिंधे सरकारने हा 'गुलदस्ता' सत्ताधारी आमदारांना देण्यासाठी दडवून ठेवला आहे का? विकास निधीपासून विकास कामांपर्यंत हे सरकार राजकारणच करीत आहे. दुष्काळासारखा जीवनमरणाचा विषय तरी त्यातून वगळा! चांदवड तालुक्यात तीन दिवसांत दुष्काळात होरपळणाऱ्या दोन शेतकऱ्यांनी मृत्युला जवळ केले. त्याची तरी चाड बाळगा. मात्र ते सोडून मिंधे सरकार दुष्काळाचीही जुमलेबाजी करीत असल्याची टीका उद्धव ठाकरे गटाने गेली आहे. ठाकरे गटाने या संदर्भात सामनामधून जोरदार टीकास्त्र सोडले आहे.राज्यातील आणखी काही तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करणार, असे राज्य सरकारतर्फे सांगण्यात आले आहे. गेल्या महिन्यात ४० तालुके सरकारने दुष्काळग्रस्त म्हणून घोषित केले होते. त्यात आता आणखी काही तालुक्यांची भर पडणार आहे. अर्थात, हे तालुके कोणते आणि त्यांची संख्या किती, हे अद्यापि जाहीर झालेले नाही. राज्य सरकारने नवीन दुष्काळग्रस्त गावांचे पिल्लू सोडले खरे; परंतु त्याचा तपशील जाहीर न करण्याची हातचलाखी केलीच. ४० तालुके दुष्काळी म्हणून घोषित केले त्यावेळीही सरकारचा दृष्टिकोन हाच होता. अर्थात, त्यातही नेहमीचे घाणेरडे राजकारण सत्ताधाऱ्यांनी केलेच होते. ४० पैकी ३५ तालुके सत्ताधारी आमदारांचे कसे? असा सवालच विरोधी पक्षांनी केला होता. दुष्काळ हा दुष्काळ असतो. मग तो ओला दुष्काळ असो की, कोरडा दुष्काळ. तो राज्यकर्ता पक्ष आणि विरोधी पक्ष, गरीब–श्रीमंत, बागायती–जिरायती असा भेद करीत नाही. त्यामुळे त्याबाबतीत तरी सत्ताधाऱ्यांनी राजकीय स्वार्थाचा विचार न करता निरपेक्ष निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा असते. मात्र राज्यात सध्याचे सरकार सत्तेत आल्यापासून प्रत्येक गोष्टीत फक्त आणि फक्त राजकारणच केले



जात आहे.आमदारांना निधी वाटण्यापासून त्यांच्या मतदारसंघांमधील समस्यांपर्यंत सत्ताधारी पक्षांनाच झुकते माप दिले जात आहे. निदान दुष्काळाबाबत तरी निरपेक्ष राहा. यंदा राज्यातील बऱ्याच भागात भीषण दुष्काळाचे सावट आहे, हे वास्तव आहे. तरीही ४० तालुके दुष्काळग्रस्त जाहीर करायला विरोधी पक्षांना सरकारला 'दे माय धरणी ठाय' करून सोडावे लागले. त्यातही सत्ताधारी आमदारांचीच काळजी घेतली गेली. मिंधे सरकारची नियत ही अशी आहे. वास्तविक ऐन पावसाळ्यात अनेक गावांमध्ये टँकरने पिण्याचे पाणी पुरविण्याची वेळ आली हाच राज्यात मोठ्या भागांत दुष्काळ असल्याचा पुरावा आहे. तरीही मिंधे सरकारची झापडे बंदच होती. विरोधी पक्षांनी टीकेची झोड उठविल्यानंतर सरकारने ४० तालुके दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर केले. तेदेखील उपकार केल्याच्या आविर्भावात. दुष्काळाचेही राजकारण करण्यात आपण मागे नाही, हेच त्यातून सरकारने दाखवून दिले. आताही सरकार तेच करणार आहे का? अन्यथा नवीन दुष्काळी तालुके आणि त्यांचे विभाग याचाही तपशील जाहीर करतानाच दिला गेला असता.४० दुष्काळग्रस्त तालुके जाहीर करताना सरकारने सत्ताधारी–विरोधक असा दुजाभाव केला. दशकानुदशके ज्यांच्या पाचवीला दुष्काळ पुजला आहे, अशा तालुक्यांचाही समावेश त्या यादीत नव्हता. आता नव्याने काही तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्याचे 'लॉलीपॉप' राज्य सरकारने दाखविले आहे. मात्र ते तालुके आणि विभाग कोणते याचा तपशील अद्यापि गुलदस्त्यात आहे. मिंधे सरकारने हा 'गुलदस्ता' सत्ताधारी आमदारांना देण्यासाठी दडवून ठेवला आहे का? विकास निधीपासून विकास कामांपर्यंत हे सरकार राजकारणच करीत आहे. दुष्काळासारखा जीवनमरणाचा विषय तरी त्यातून वगळा! दुष्काळ आणि नापिकीमुळे शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्यांची कदर करा. चांदवड तालुक्यात तीन दिवसांत दुष्काळात होरपळणाऱ्या दोन शेतकऱ्यांनी मृत्यूला जवळ केले. त्याची तरी चाड बाळगा. मात्र ते सोडून मिंधे सरकार दुष्काळाचीही जुमलेबाजी करीत आहे. वरून दुष्काळग्रस्तांना दिलासा देत असल्याचा आव आणीत आहे. हा दिलासा नसून दुष्काळग्रस्तांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार आहे.

# न्यू इंग्लिश स्कूल ज्युनि.कॉलेज सांगोला राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने फटाके मुक्त 'दिवाळी' शपथ

**सांगोला । प्रतिनिधी**

सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ सांगोला संचलित न्यू इंग्लिश स्कूल ज्युनि.कॉलेज सांगोला मधील राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांनी फटाके मुक्त दीपावली साजरी करण्याची घेतली शपथ.. सध्याच्या काळात वाहनांची वाढती संख्या, इंधनाचे ज्वलन, वाढती वृक्षतोड, कारखानदारी, लोकसंख्या वाढ यासारख्या अनेक कारणामुळे पर्यावरणाचे प्रदूषण वाढत चालले आहे. त्याचबरोबर आपण वर्षभरामध्ये अनेक सण उत्सव साजरे करतो, त्याचाही परिणाम पर्यावरण प्रदूषणावर होतो. या सर्व उत्सवापैकीच दीपावली हा एक मोठा सण असून तो साजरा करत असताना मोठ्या प्रमाणात फटाके फोडले जातात, त्यामुळे ध्वनी प्रदूषण आणि वायू प्रदूषण वाढून पर्यावरणाची हानी तर होतेच, तसेच मानवी



आरोग्यावर त्याचा विपरीत परिणाम होतो, हे घातक परिणाम टाळण्यासाठी न्यू इंग्लिश स्कूल ज्युनि.कॉलेज सांगोला मधील राष्ट्रीय सेवा योजनेतील सर्व स्वयंसेवकांना कार्यक्रमाधिकारी प्रा.मिलिंद पवार यांनी फटाके मुक्त दीपावली साजरी करण्याची शपथ दिली. तेव्हा राष्ट्रीय स्वयंसेवकांनीही फटाके न फोडण्याचा निर्धार केला.या उपक्रमावेळी संस्था संचालक प्रा. डॉ. अशोकराव शिंदे, पर्यवेक्षक प्रा. संजय शिंगाडे, प्रकल्पाधिकारी प्रा. संतोष राजगुरू, कार्यक्रमाधिकारी प्रा. सुनिता लिगाडे, प्रा.जुलेखा मुलाणी व एन.एस.एस. स्वयंसेवक उपस्थित होते. या उपक्रमासाठी प्राचार्य हेमंतकुमार आदलिंगे व उपप्राचार्य केशव माने यांचे मार्गदर्शन लाभले.

# इनर व्हील क्लब तर्फे १० कुटुंबांना दिवाळीचे सामान भेट


**सांगोला । प्रतिनिधी**

इनर व्हील क्लब तर्फे दहा गरीब व गरजू महिलांना दिवाळी चे सामान वाटप करण्यात आले क्लब च्या वतीने झोपडपट्टीतील गरीब व इतरही गरजू कुटुंबाच्या चेहऱ्यावर आनंद आणता यावा, आणि दिवाळी सारखा मोठा सण साजरा करता यावा .म्हणून सुवासिक तेल, उटणे ,मोती साबण ,प्रत्येकी सहा पणत्या, सहित तेल ,हरभरा डाळ, साखर, गरा ,मैदा,व चिवड्यासाठी पोहे इत्यादी किराणा मालाचे सर्व साहित्य देऊन त्यांचा आनंद दुगना करून दिवाळी सणासाठी नवचैतन्य निर्माण केले .यासाठी क्लबचे अध्यक्ष सौ सविता लाटणे, अश्विनी कांबळे ,संगीता चौगुले, स्वाती ठोंबरे ,संगीता पाखरे, करुणा जांगळे, अनिता कमले उपस्थित होत्या.



# मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे–धीरेंद्र शास्त्री

**छत्रपती संभाजीनगर**–श्री बागेश्वर धामचे प्रमुख धीरेंद्र शास्त्री यांची रामकथा प्रवचनमाला सोमवारपासून छत्रपती संभाजीनगरात सुरू झाली आहे. भाविकांच्या वतीने त्यांचे शहरात जल्लोषात स्वागत करण्यात आले. पहिल्या दिवशी धीरेंद्र शास्त्री यांनी पत्रकार परिषद घेऊन अनेक प्रश्नांना बेधडक उत्तरे दिली. हिंदू धर्म, मराठा आरक्षण, राजकारण यासह चालू घडामोडींवर शास्त्रींचे परखड विचार त्यांच्याच शब्दांत...धर्म आणि राजकारण हातात हात घालून चालते. राजकारणाने धर्मकारण चालत नाही. पण, धर्मकारणाने राजकारण नक्कीच चालते. सनातन हिंदुत्व स्थापन करणे हे माझे उद्दिष्ट आहे. त्यासाठी कथांच्या माध्यमातून मी प्रचार, प्रसार करत आहे. कोणत्याही पक्षाचा किंवा राजकीय व्यक्तीचा प्रचार–प्रसार बागेश्वर धामच्या गादीवरून केला जात नाही. यापुढेही केला जाणार नाही. निवडणूक लढल्याने हिंदू राष्ट्राची निर्मिती होणार नाही. लोकांच्या विचारपरिवर्तनाने हिंदू राष्ट्र बनेल. सनातन धर्माच्या प्रचार–प्रसाराने हिंदू राष्ट्राची निर्मिती होईल. त्यामुळे मी निवडणूकही लढणार नाही. मी धर्मप्रचारावर विश्वास ठेवतो. मी फक्त हिंदूंना जागवण्याचा प्रयत्न करेन. महात्मा कुणा एकाचा नसतो. आज या ठिकाणाहून मी सर्व राजकारण्यांना निवेदन करतो की, कोणत्याही बाबांमुळे तुम्ही निवडणूक जिंकू शकणार नाही. त्याउलट जनतेला 'बाबा' मानून काम करा. तरच निवडणूक जिंकणे शक्य आहे. कारण



जनता हीच परमात्मा आहे.भारतातील कोणताही धर्मगुरू इतके परखडपणे सांगू शकत नाही. फक्त मीच बोलू शकतो. कारण, मी स्वतंत्र धर्मगुरू आहे. सनातन हिंदू धर्माची स्थापना संपूर्ण भारतात करण्याचे माझे ध्येय आहे.मला मनातील गोष्ट वाचता येणे हा एक वेगळा विषय आहे. अधिकारांची गोष्ट करणे, हा एक वेगळा विषय आहे. भारत जेव्हा संकटात होता, तेव्हा आपल्या शौर्याने देशाला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या जमातीला आरक्षण मिळणे हा त्यांचा हक्क आहे. सरकारने त्यांच्याशी चर्चा करून मराठा समाजाला आरक्षण दिले पाहिजे.अंधश्रद्धा निर्मूलन समिती माझ्यावर अंधश्रद्धा पसरवत असल्याचा आरोप करते. पण ते फक्त मीडियातून आरोप करतात. प्रत्यक्ष समोर येऊन त्यांनी माझ्याशी संवाद साधलेला नाही. जेव्हा ते संवाद साधतील तेव्हा उत्तर देण्यासाठी मी सक्षम आहे. आताही मी इथे उपलब्ध आहे. त्यांनी यावे, चर्चा करावी, असे आवाहन धीरेंद्र शास्त्रींनी केले.मी 'छत्रपती संभाजीनगर के पागलों की जय' असे म्हणालो. कारण, रात्री मी ९ वाजता विमानतळावर आणि नंतर १२ वाजता निवासस्थानी पोहोचलो. तेव्हा येथील हिंदुत्ववादी जल्लोष करत होते. दुतर्फा गर्दी, झेंडे, जयजयकार हेच सांगते की हे सर्व सनातन हिंदू धर्मासाठी वेडे झालेले लोक होते.२०१० नंतर सनातन हिंदू म्हणण्यासाठी लोकांना भीती वाटत होती. आता लोक निर्भीडपणे हिंदुत्वाबद्दल बोलतात. पूर्वी आध्यात्मिक गुरूंना संकुचितपणे सनातन हिंदू धर्माविषयी बोलावे लागत होते. पण, मी जेव्हापासून कथा करतो आहे, सनातन हिंदू धर्माविषयीच निर्भीडपणे बोलतोय. जोवर संपूर्ण देश हिंदू राष्ट्र होणार नाही, तोवर हिंदू या देशात सुरक्षित नाहीत.संत तुकारामांबद्दल मी जे बोललो, ते एका पुस्तकाच्या संदर्भातून बोललो होतो. ज्याचा मी तत्काळ खुलासाही केला. बागेश्वर पीठ कधीही संतांबद्दल अपशब्द बोलत नाही. ज्या दिवशी असे घडेल त्या दिवशी मी पीठावर बसणे सोडून देईन. आतापर्यंतचे सर्व संत शांतीची भाषा बोलत आले आहेत. पण, त्यामुळे हिंदू धर्माचे हे हाल झाले. आता क्रांतीची भाषा बोलली पाहिजे, म्हणून मी परखडपणे बोलतो. सनातन वादाचा नव्हे तर संवादाचा विषय आहे.

# जरांगे पाटलांना धमकविणाऱ्या नीतेश राणेंची मराठा समाजाने दखल घ्यावी–खासदार विनायक राऊत

**मुंबई**–नीतेश राणे हे मराठा समाजाचे मारेकरी आहेत. मनोज जरांगे पाटलांच्या विरोधात नितेश राणे आहेत. एकीकडे संरक्षण द्या अशी मागणी करायची आणि दुसरीकडे धमकवायचे अशी दुतोंडी भुमिका नितेश राणेंची आहे अशी टीका खासदार विनायक राऊत यांनी भाजप आमदार नितेश राणे यांच्यावर केली. खासदार विनायक राऊत हे आज सिंधुदुर्ग येथे माध्यमांशी बोलत होते.खासदार राऊत म्हणाले ३१ डिसेंबर ही अपात्रतेची डेडलाईन असल्यामुळे शिंदे सरकारने आपलं राजकीय निवृत्तीचे मरण पुढे ढकलण्यासाठी जरांगे पाटलांवर दबाव टाकून मराठा आरक्षणावर २ जानेवारीची मुदत वाढ घेतली.महाराष्ट्र सरकारने मराठा समाजाची फसवणूक केलेली आहे



असा आरोप खासदार विनायक राऊत यांनी केला आहे. निवृत्त न्यायाधीश अथवा ज्यांचा मराठा आरक्षणाबाबत संबंध नसताना सरकारने असे लोक मनोज जरांगे पाटील यांच्याकडे पाठवली. त्यानंतर झालेल्या चर्चेतून हा विषय पुन्हा काही दिवस पुढे गेल्याचे खासदार राऊत यांनी नमूद केले.खासदार विनायक राऊत म्हणाले की, नीलेश राणेंनी राजकीय निवृत्ती घेऊ नये. पुन्हा एकदा लोकसभेच्या रिंगणात उतरावे. मग, पराभव काय असतो, ते दाखवतो, असे आव्हान विनायक राऊतांनी नीलेश राणेंना दिले आहे. राजकीय नाटक कसे करायचे, हे राणे कुटुंबाकडून शिकूव घ्यावे. एकीकडे नारायण राणेंनी नीलेश राणेंना फटकारले आहे. तर, दुसरीकडे नितेश राणेंनी निलेश राणेंना वाटाण्याच्या अक्षता लावल्या आहेत. भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे कोकण दौऱ्यात आले असताना नीलेश राणेंना कुठे स्थान मिळाले,हे सर्व लोकांनी पाहिले आहे.

# ग्रामपंचायत निवडणुकीत रोहित पवारांना धक्का

**अहमदनगर**–ग्रामपंतायत निवडणुकीत शरद पवार गटाचे कर्जत जामखडेचे आमदार रोहित पवार यांना धक्का बसला आहे. कर्जत–जामखेडमधील ग्रामपंचायत निवडणुकांचे सर्व निकाल जाहीर झाले आहेत. यात रोहित पवार यांना केवळ दोन ग्रामपंचायतीत विजय मिळवता आला आहे. रोहित पवार यांचे विरोधक व भाजप आमदार राम शिंदे यांनी या निकालांत बाजी मारली आहे.कर्जत आणि जामखेडमध्ये एकूण ९ ग्राम पंचायतींचे निकाल हाती आले आहेत. त्यानुसार भाजपचे आमदार राम शिंदे यांनी ५ जागांवर विजय मिळवला आहे. तर आमदार रोहित पवार यांचे समर्थन असलेल्या पॅनेल्सना केवळ दोन जागांवर विजय मिळवता आला आहे. एक जागा अजित पवार गटाने आपल्याकडे खेचली आहे. तर, एका ग्रामपंचायतीवर स्थानिक आघाडीने झेंडा फडकावला आहे.ग्रामपंचायत निवडणूक ही कोणत्याही पक्षाच्या चिन्हावर लढवली जात नाही. मात्र, बहुतांश वेळी ग्रामपंचायत निवडणुकीत उभे राहणारे पॅनेल हे एखाद्या राजकीय पक्षाशी संबंधित तरी असतात किंवा या पॅनेल्सना राजकीय पक्षांचा पाठिंबा तरी असतो. विशेषत: नेत्यांचे बालेकिल्ले असलेल्या मतदारसंघांमधील ग्रामपंचायतीच्या निवडणुका अटीतटीने लढल्या जातात. ग्रामपंचायत निवडणूक निकालातून मतदारांचा कल कुठल्या दिशेला आहे, ते कळून येते. त्यामुळे पुढच्यावर्षी होणाऱ्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीचा विचार करता ग्रामपंचायतीच्या या निकालांमुळे रोहित पवारांची चिंता वाढली आहे.राज्यात आज ग्रामपंचायत निवडणुकीचे निकाल जाहीर होत आहेत. या निवडणुकीत महायुतीचा वरचष्मा दिसत आहे. आतापर्यंत हाती आलेल्या निकालानुसार महायुतीने ६८८ पेक्षा जास्त ग्रामपंचायतीत विजय मिळवला आहे. तर, महाविकास आघाडीने जेमतेम २०० ग्रामपंचायतीवर विजय मिळवला आहे. एकूण २३५९ ग्राम पंचायतींचे निकाल आज जाहीर होत आहे. आतापर्यंत हाती आलेल्या निकालांवरुन भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. तर, शिंदे गटापेक्षा अजित पवार गट सरस ठरला आहे. सर्वात मोठा फटका ठाकरे गट आणि शरद पवार गटाला बसला आहे.

# मंगळवेढा तालुक्यात ग्रामपंचायत २७, तर दावे ७०

**मंगळवेढा** – तालुक्यातील २६ ग्रामपंचायतीच्या निवडणूकीची मतमोजणी शासकीय गोदामात पार पडली. निकालानंतर विजयी सरपंच आणि सदस्यांनी गुलालाची व फटाक्याची आतिषबाजी करत जल्लोष साजरा केला. मात्र, निकालानंतर तालुक्यातील सर्वच राजकीय नेत्यांनी या ग्रामपंचायतीवर आपलेच वर्चस्व असल्याचा दावा केला. दरम्यान निंबोणी ग्रामपंचायतीमध्ये बिरूदेव घोगरे हे तालुक्यात सर्वाधिक ९०६ मतांनी विजयी झाले.या ग्रामपंचायतीसाठी काल तालुक्यात ८१.४८% इतके मतदान झाले. ५२ हजार ३१० पैकी ४२ हजार ६२० मतदारानी मतदानाचा हक्क बजावला होता. आज सकाळी आठ वाजता तहसीलदार मदन जाधव यांनी अतिशय नियोजनबद्ध सात फेऱ्यात मतमोजणी घेतली.आंधळगाव येथे अंकुश डांगे व वर्षा डांगे यांना २८६ इतकी तर अकोला येथे अमोल सरवदे व रवींद्र शिरसागर यांना २०३ इतकी समान मते पडल्यावर चिठ्ठीवर आंधळगाव येथे अंकुश डांगे तर अकोला येथे अमोल सरवदे यांना विजय घोषित करण्यात आले. निकालानंतर उमेदवाराच्या समर्थकांनी जल्लोष केला. पोलीस निरीक्षक रणजीत माने हे उल्लडबाजी करू नका. केल्यास तुमची दिवाळी जेलमध्ये जाईल असा इशारा देत होते.मतमोजणीनंतर फेरीवाईज उमेदवार व समर्थक बाहेर काढले जात होते. हिवरगाव येथे सरपंच व सहा सदस्य बिनविरोध निवडले गेले होते. एका जागेसाठी झालेल्या मतदानामध्ये बलभीम नागणे हे जिल्हा नियोजन मंडळ सदस्य प्रदीप खांडेकर यांच्या नेतृत्वाखालील गटाचे विजयी झाले. निंबोणी येथे सरपंचपदाचे बिरूदेव घोगरे हे सर्वाधिक मताने ९०६ विजयी तर शेलेवाडी येथील सुनिता माळी या तीन मतांनी विजयी झाल्या.शिरसी येथे सरपंच पदासाठी उभे असलेले दामाजीचे संचालक तानाजी कांबळे यांचा पराभव झाला तर या ठिकाणी जयश्री गायकवाड या एका मताने विजयी झाल्या. तर नंदूर येथे परमेश्वर येणपे,आणि चनबसू येणपे हे दोघे बंधू सदस्यपदी विजयी झाले.ग्रामपंचायत निवडणुकीच्या निकालानंतर आ. समाधान आवताडे गटाने २०, तर भगीरथ भालके यांनी ७, माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या गटाने १३ , जिल्हा मध्यवर्ती बँकेचे उपाध्यक्ष बबनराव आवताडे यांच्या गटाने १५ व काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रशांत साळे यांच्या गटाने ४,राष्ट्रवादीचे अभिजीत पाटील यांच्या गटाने १३ या ग्रामपंचायतीवर आपले वर्चस्व असल्याचा दावा केला.विजयी उमेदवारांनी सर्वच राजकीय पक्षाच्या कार्यालयात हजेरी लावत आम्ही तुमचेच आहे असे म्हणत सत्कार स्वीकारले. त्यामुळे मतमोजणीनंतर लोणार येथे विजयानंतर जल्लोष करताना दोन गटात वादावादी होऊन त्याचे पर्यावसन भांडणात झाले. दरम्यान उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रांत गायकवाड व पोलीस निरीक्षक रणजीत माने हे तात्काळ घटनास्थळी दाखल होऊन परिस्थितीवर नियंत्रण मिळवले.



# अभाविपच्या ६९ व्या राष्ट्रीय अधिवेशनाचे पोस्टर विमोचन

## दिल्लीत अभाविप च्या राष्ट्रीय अधिवेशनासाठी उभारली जाईल इंद्रप्रस्थ नगर नावाची टेट सिटी

वर्धा । प्रतिनिधी

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे(अभाविप) दि. ०७ ते १० डिसेंबर दरम्यान दिल्लीत आयोजित करण्यात आलेल्या अमृत महोत्सवाच्या ६९ व्या राष्ट्रीय अधिवेशनाचे पोस्टर शनिवारी ०४ नोव्हेंबर ला नागपूर येथे प्रकाशित करण्यात आले. यावेळी अभाविप चे विदर्भ प्रदेश मंत्री शक्ती केराम, प्रदेश सहमंत्री पायल किनाके, प्रांत सोशल मिडिया संयोजक शुभम सावनकर, पश्चिम नागपूर जिल्हा संयोजक अबुइज़र हुसैन, नागपुर महानगर मंत्री कार्तिक सिरीया उपस्थित होते. या पत्रकार परिषदेद्वारे प्रदेश मंत्री शक्ती केराम यांनी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या राष्ट्रीय अधिवेशनातील सर्व बाबींची माहिती मांडली.
अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या राष्ट्रीय अधिवेशनाच्या चार दिवसीय कार्यक्रमात देशातून तसेच विदर्भाच्या कानाकोपऱ्यातून विद्यार्थी सहभागी होउन दिल्लीला पोहोचणार आहेत.
अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या ७५ वर्षांच्या संघटनात्मक वाटचालीतील महत्त्वाचे टप्पे विद्यार्थ्यांना परिचित करण्यासाठी, देशातील विविधतेतील विद्यार्थी चळवळीतील प्रमुख शक्ती म्हणून विद्यार्थी परिषदेचे योगदान, देशाच्या विविध कानाकोपऱ्यातून भाग घेणाऱ्या युवाशक्ती द्वारा विविधतेत एकतेचे स्वरूप दिसणार आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने अधिवेशनात विविध प्रयत्न करण्याचे नियोजन केले आहे, जेणेकरून विद्यार्थ्यांना आधुनिकतेबरोबरच आपल्या मुळाशी परिचित होता यावे आणि भारताचा एक राष्ट्र म्हणून सतत वाहणारा प्रवास समजावा. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे राष्ट्रीय अधिवेशन डीडीए ग्राउंड, बुराडी येथे होणार असून तेथे संपूर्ण तात्पुरते शहर उभारले जाईल. या संपूर्ण शहराला पांडवकालीन राजधानी असलेल्या इंद्रप्रस्थ नगराचे नाव देण्यात आले आहे.या शहराच्या मुख्य सभागृहाला अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे दिवंगत राष्ट्रीय संघटन मंत्री आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सह सरकार्यवाह स्व. मदनदास देवी यांचे नाव. तसेच या इंद्रप्रस्थ शहरातील निवासी संकुलांच्या दारांना महाराज सूरजमल आणि सम्राट मिहिर भोज यांची नावे देण्यात येणार आहेत. डीडीए मैदानावर टेंट सिटी उभारण्याचे काम सुरू झाले आहे.अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, आपल्या संघटनात्मक प्रवासाच्या ७५ व्या वर्षाच्या स्मरणार्थ, ईशान्य भारतातील राज्यांचा सखोल परिचय करून देण्याच्या उद्देशाने आंतरराज्य विद्यार्थी जीवन दर्शन (सील) अंतर्गत ईशान्य अभ्यास दौर्याचे आयोजन करत आहे. उर्वरित भारतातील तरुण, ज्या अंतर्गत देशभरातील विविध विद्यार्थी - विविध राज्यांतील ७५ विद्यार्थी नैसर्गिक विविधता, कौटुंबिक आणि सामाजिक रचना इत्यादींच्या दृष्टिकोनातून अभ्यास करण्यासाठी पूर्वोत्तर राज्यांना भेट देतील. हा प्रवास ०५ नोव्हेंबर रोजी गुवाहाटी, आसाम येथून सुरू होणार आहे.अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे विदर्भ प्रदेश मंत्री म्हणाले की, विद्यार्थी चळवळ म्हणून विद्यार्थी परिषदेच्या पंचाहत्तर वर्षांच्या प्रवासाने देशातील तरुणांच्या महत्त्वाच्या प्रश्नांना आवाज दिला आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या दिल्लीत होणाऱ्या राष्ट्रीय अधिवेशनात सध्याच्या शिक्षण क्षेत्रातील बदलत्या परिस्थितीसोबतच समाज, तरुण आणि शिक्षणाशी संबंधित प्रश्नांवर प्रकाश टाकण्यात येणार आहे. या राष्ट्रीय अधिवेशनात, विद्यार्थी परिषद देशाच्या सर्व प्रांतातून येणारे विद्यार्थी, प्राध्यापक आणि शिक्षणतज्ज्ञ यांच्या संवादातून आपल्या आगामी कृती आराखड्याला आकार देईल.




# मराठे कुणबी नाहीत तर कोण आहेत?:बच्चू कडू यांचा भुजबळांना प्रश्न

## मराठे कुणबी नसल्याचा दावा करणे म्हणजे शुद्ध मूर्खपणा

**मुंबई–**मराठवाड्यातील मराठा समाज कुणबी असल्याचे सूर्यप्रकाशाएवढे स्वच्छ आहे. त्यामुळे ते कुणबी नसल्याचा दावा करणे शुद्ध मूर्खपणा आहे, असा तिखट शब्दांत प्रहार संघटनेचे नेते तथा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विश्वासू बच्चू कडू यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे मंत्री छगन भुजबळ यांच्यावर निशाणा साधला आहे. मराठे कुणबी नाहीत तर कोण आहेत? हे सांगा, असा प्रश्नही त्यांनी भुजबळांना केला आहे.मराठा समाजाला ओबीसी कोट्यातून आरक्षण देण्याच्या मुद्यावरून अवघ्या महाराष्ट्राचे राजकारण तापले आहे. या प्रकरणी मंत्री छगन भुजबळ यांनी कडाडून विरोध केला आहे. त्यावर बच्चू कडू यांनी भुजबळ यांचा तिखट समाचार घेतला आहे. मराठा समाजाला कुणबी म्हणून १०० टक्के आरक्षण मिळेल. कुणबी नोंदी आढळणाऱ्यांना आरक्षण दिले जाईल. ते कुणबी असल्याचे १०० टक्के सत्य आहे, असे बच्चू कडू म्हणालेत.मराठा हे कुणबी नाहीत तर कोण आहेत हे छगन भुजबळ यांनी आम्हाला सांगावे. मुळात मराठे हे कुणबीच आहेत. पण काहीजण मतपेटीच्या हिशेबाने मुद्दे पुढे करून स्वतःची राजकीय पोळी शेकण्याचा प्रयत्न करत आहेत. हे चुकीचे आहे. या प्रकरणी कोर्ट योग्य तो निर्णय घेईल. पण कुणबी नोंद असेल तर देशात कुणालाही आरक्षणात आडकाठी आणता येणार नाही. सरसकट मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र मिळाल्याशिवाय राहणार नाही, असेही बच्चू कडू एका मराठी वृत्तवाहिनीशी बोलताना म्हणाले.छगन भुजबळ यांनी मराठवाड्यात कुणबीच्या वाढत्या नोंदींवर सवाल उपस्थित केला होता. बच्चू कडू यांनी त्यावरही टीका केली. मराठवाड्यात नोंदी आहेतच. सरकार सर्व जुन्या नोंदी काढत आहे. या नोंदी काही पाकिस्तान, अमेरिकेतून आल्या नाहीत. भुजबळ अभ्यासू नेते आहेत. त्यांनी तपासले पाहिजे, असे ते म्हणाले.महात्मा फुलेंनीही सांगितले होते की, कुणबी, माळी, धनगर हे सख्खे भाऊ आहेत. त्यांना वेगळे करू नका. त्याहीपुढे जाऊन ते म्हणाले की महाराष्ट्रातल्या अठरापगड जातीचे सर्वच लोक मराठा आहेत. मराठा हा समूहवाचक शब्द आहे. तो एका जातीचा नाही. त्यामुळे भुजबळांनी अभ्यास असूनही असे बोलावे याचे नवल वाटते, असेही बच्चू कडू यावेळी म्हणाले.मी स्वतः कुणबी आहे. माझी जुनी नोंद कुणबी सापडली. मी मराठ्याचा कुणबी झालो. पश्चिम महाराष्ट्र, मुंबई, कोकण, विदर्भातील मराठ्याचे कुणबी झाले. आता मराठवाड्यातील ५-६ जिल्ह्यातील मराठे कुणबी नाहीत असे म्हणणे म्हणजू शुद्ध मूर्खपणा आहे. मराठे कुणबीच आहेत हे सूर्यप्रकाशाएवढे स्वच्छ आहे, असेही बच्चू कडू यावेळी बोलताना म्हणाले.



# आ.कांबळे यांच्या हस्ते नाचनगांव येथील आदिवासी भवनाचे लोकार्पण

वर्धा। प्रतिनिधी

नाचनगांव येथील वार्ड नंबर ६ येथील ग्रामपंचायत सदस्य तुषार पेंढारकर यांच्या विनती वरुण आदिवासी समाज बांधवाना एक हक्काचे सभागृह असावे अशी मागणी आमदार रणजीत कांबळे तसेच मनोज वसु यांना केली होती. ही मागणी लक्षात घेऊन आमदार रणजीत कांबळे यांनी राज्यसभा खासदार पी. चिदंबरम यांच्या निधीतुन १२.९८ लाख मंजूर करुण घेतले. ग्रामपंचायत सदस्य तुषार पेंढारकर यांच्या विंनती व सतत केला पाठपूरावा यांची दखल घेत रणजीत कांबळे यांनी विकास निधी दिलाआणि समाज बांधवासाठी एक प्रशस्त इमारत बांधण्यात आली.या आदिवासी भवनाचे लोकार्पण आमदार रणजित कांबळे यांच्या हस्ते पार पडले तसेच वार्ड नंबर ६ येथे सीमेंट रस्ते व नाली बांधकाम, तार कंपाउंड, सौंदर्यीकरण असे एकूण ५० लाख रूपयाचे भूमिपूजन संपन्न झाले.
या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून आ . रणजीत कांबळे, तसेच प्रमुख पाहुणे मनोज वसु, सरपंच निलिमाराऊत, संजय पवार, देवानंद गायधने, प्रमोद बिरे,सतीश पाटिल,अशोक आठबैले, गुणवंत काळे, तुषार पेंढारकर उपस्थित होते. या कार्यक्रमात प्रचंड जनदमुदाय सहभागी झाला होता. आदिवासी समाज बांधवांनी जास्त सहभाग नोंदवला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आरिफभाई पठान, अनंता नावाडे, सतीश सांगळे, देवेंद्र ठाकरे, गोपाल कड़व, भाऊराव पारिसे, शेख रौफ, शेख अकील, रमेश कड़व,शंकर नैताम,भूषण पूसनाके, शुभम मसराम, दशरथजी पुसनाके,राजू नैताम,कपिल नैताम,संतोष चाचरकर, सचिन मसराम,गीता मसराम, ममता नारनवारे,ललिता उइके,आश्विनी मसराम,मंदा मसराम,तारा कोडापे,बेबी मसराम,मिना मसराम, सुमित्रा उइके,रमेश सैयाम,सचिन मसराम,प्रवीण कौराती,गजानन कन्नाके,सुरेंद्र वरठी,प्रभाकर धुर्वे,अंकुश उइके आदींनी सहकार्य केले.




# नितीश कुमारांनी माफी नव्हे मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिला पाहिजे–नवनीत राणा

**मुंबई–**बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी महिलांबाबत वादग्रस्त विधान केले. महिलांचे शिक्षण व लोकसंख्या याबाबत बोलताना काही वादग्रस्त बोलून गेले. यावरून आता नितीश कुमार यांच्यावर जोरदार टीका करण्यात आली. तर अमरावतीच्या खासदार नवनीत राणा यांनी देखील या संदर्भात संताप व्यक्त केला. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी विधानभवनात असे शब्द वापरणे म्हणजे संपूर्ण देशभरातील महिलांचा अपमान आहे, असा घणाघात राणा यांनी केला.बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी संपूर्ण देशभरातील महिलांचा केला अपमान आहे. मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी जाणून बुजून असे राजकीय विधान केले आहे. यानंतर कोणत्याही राजकीय पक्षांनी त्यांना साथ देऊ नये. ७५ वर्षाच्या व्यक्तीने असे अपशब्द काढल्याने संपूर्ण देशभरातील महिलांनी रस्त्यावर उतरले पाहिजे. महिलांबद्धल आधी विधान करायचं आणि नंतर माफीनामा काढायचा, असं नवनीत राणा यांनी म्हटले. नितीश कुमार यांनी माफी नाही, तर राजीनामा द्यायला हवा, अशी मागणी नवनीत राणा यांनी केली आहे.बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी मंगळवारी विधानसभेत लोकसंख्या नियंत्रणावर दिलेल्या वक्तव्यावरुन गदारोळ पाहायला मिळत आहे. महिला आयोगापासून ते सर्वसामान्य जनतेपर्यंत सर्व स्तरांतून नितीश कुमार यांचा निषेध केला जात आहे. राष्ट्रीय महिला आयोगने नितीश कुमार यांना तत्काळ देशातील महिलांची माफी मागण्यास सांगितले आहे. सोशल मीडियावरही त्यांच्या या विधानाला जनता प्रचंड संताप व्यक्त करत आहे.लोकसंख्या नियंत्रणाबाबत केलेल्या वक्तव्यावर मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी माफी मागितली आहे. तुम्हाला दुखावले असेल तर मी माफी मागतो, असे मुख्यमंत्री नितीश कुमार म्हणाले. मी बिहारमध्ये शिक्षणासाठी इतका पैसा निश्चित केला आणि मुलींना शिकवायला सुरुवात केली, असे मुख्यमंत्री म्हणाले. माझ्या मनातून काही शब्द निघाले, मी पुरुष आणि स्त्रीबद्दल माफी मागतो. मुख्यमंत्र्यांनी माफी मागितल्यानंतरही भाजप माफ करायला तयार नाही. या विधानानंतर मुख्यमंत्र्यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, असे विधानसभेतील विरोधी पक्षनेत्यांनी स्पष्टपणे म्हटले आहे.



# मराठा आरक्षणासाठी आत्महत्या केलेल्या ३५ जणांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी ५ लाखांची मदत–तानाजी सावंत



**पुणे–**मराठा आरक्षणासाठी आत्महत्या होणे ही बाब दुःखद घटना आहे. मागील दोन महिने आरक्षणाबाबत विविध राजकीय पक्ष आपली भूमिका मांडत आहे. मागील वेळी देखील मराठा आरक्षण साठी ५८ मोर्चा शांततेच्या मार्गाने काढण्यात आले. यादरम्यान ४२ जणांनी आत्महत्या केली. आत्महत्या करणे हा योग्य मार्ग नाही. आत्महत्या सारखा टोकाचा निर्णय घेणे चुकीचे आहे. अचानक एखादे वादळ यावे तसे आरक्षण आंदोलन सुरू झाले असे मत मंत्री तानाजी सावंत यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.मराठा आरक्षणासाठी आत्महत्या करणाऱ्या ३५ जणांच्या कुटुंबियांना मंत्री तानाजी सावंत यांनी मदतीचा हात दिल्या त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी छत्रपती संभाजी राजे उपस्थित होते. सावंत म्हणाले, घरातील कर्ता व्यक्ती गेल्याने नंतर कोण त्या कुटुंबाकडे पाहत नाही. आरक्षण आज किंवा उद्या मिळेल आणि विषय संपेल. परंतु कुटुंब सावरण्यासाठी कळकळीची विनंती आहे की, टोकाचा निर्णय घेऊ नका. हा लढा कशासाठी सुरू आहे ते पहा. शासन आपला निर्णय घेईल मी कोणती भूमिका आज मांडणार नाही. मराठा समाज माझा असून आत्महत्या, आरक्षण हे अंतिम साध्य नाही. आत्महत्या केलेल्या ३५ कुटुंबातील व्यक्तींना आधार देण्यासाठी प्रत्येक कुटुंबाला पाच लाख रुपये आणि दिवाळी फराळ देण्यात येत आहे. संबधित कुटुंबातील मुले यांचे शैक्षणिक पालकत्व आणि मुलं व मुलींचे लग्न पर्यंत करण्याचा खर्च मी आजपासून उचलत आहे.संभाजीराजे छत्रपती म्हणाले, मराठा समाजातील मुलांनी समाजासाठी बलिदान केले आहे. मला अत्यंत दुःख वाटत आहे की, संबधित समूहातील कुटुंबाशी कोणती चर्चा करू असे माझ्या मनात वाटत होते. परंतु, समाज प्रबोधन गरजेचे आहे. आत्महत्या हा योग्य मार्ग नाही छत्रपती शिवाजी महाराज यांनी आपल्याला लढा देण्यास शिकवले आहे. राज्यात आत्महत्या होणे योग्य नाही. छत्रपती शिवाजी महाराज यांची शिकवण लढण्याची आहे. त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन आपण जीवनात काम केले पाहिजे. जीवनात अनेक संकट येत असतात पण ते करताना ,जीवनात काही मिळवायचे असेल तर लढून मिळवावे लागते हे सर्व समाजातील लोकांनी लक्षात घ्यावे.